MHGA090004162026

SCC No.255/2026

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी, जि.गडचिरोली यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी वाय.जे.वळवी)

सं.मा.क्र.२५५/२०२६
निशानी क्र.०३

**-: गुन्हयाचे विवरण :-**

१. अपराध घडल्याचा दिनांक — ०६/०३/२०२६

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक — ०६/०३/२०२६

३. फिर्यादीचे नाव व पत्ता — महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस ठाणे आष्टी.

४. आरोपीचे नाव, वय व निवासस्थान — लखन बंडु पधरे,
वय ३५ वर्षे, व्यवसाय चालक,
रा. खरापेठ,
ता.गोंडपिपरी,जि.चंद्रपुर.

५. अपराधाचा तपशिल

तुम्ही दिनांक ०६/०३/२०२६ रोजी १५.२५ ते १६.१० वाजताचे सुमारास मौजा आष्टी येथील बाजरवाडी, येथे टि-पाईंट, आष्टी ते चंद्रपुर रोड समोर रस्त्याच्या मधोमध तुमचे ताब्यातील तिन चाकी ऑटो वाहन क्र. एम.एच ३४ बि.एच. ०६८५ रस्त्याचे मधोमध उभे करुन येणारे जाणारे लोकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होईल व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केलेले मिळुन आला व त्याद्वारे तुम्ही भारतिय न्याय संहिताचे कलम २८५ अन्वये गुन्हा केला.

६. आरोपीचे प्रतिकथन

प्रश्न १ : तुम्हाला फिर्यादीची नक्कल मिळाली आहे का ?
उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हाला तुमच्यावरील आरोप मान्य आहेत का ?
उत्तर : होय.

आरोपीला त्याच्यावरील आरोप मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला व तो मान्य केला.

....................
आरोपीची सही/अंगठा
दि.१४/०३/२०२६.

स्वा/-
(एस.ए.भैसारे)
पॅनल प्रमुख
तालुका विधी सेवा समिती
चामोर्शी

MHGA090004162026

SCC No.255/2026

**आदेश**

आरोपीविरुध्द भारतिय न्याय संहिताचे कलम २८५ अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीने स्वईच्छेने सदर गुन्हा कबुल असल्याची पुरसीस निशानी २ दाखल केली. आरोपीला गुन्हयाचे स्वरुप व दंड रकमेची माहिती दिली तरी देखील आरोपी गुन्हा स्वईच्छेने कबुल करण्यास तयार आहे. आरोपीला शिक्षेसंबंधी एकुन घेण्यात आले. आरोपीने सांगितले की, त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह त्याच्या कमाईवर अवलंबुन आहे तसेच त्याने यापुर्वी अशा प्रकारचा कोणताही गुन्हा केला नाही. त्यामुळे त्याला कमीत कमी दंडावर सोडण्यात यावे. गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश करण्यात आला.

**आदेश**

आरोपी लखन बंडु पधरे, रा. खरापेठ, ता.गोडंपिपरी, जि.चंद्रपुर याला भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(२) अन्वये भारतिय न्याय संहिताचे कलम २८५ चे गुन्हयासाठी दोषी ठरवुन त्याला रु. १,०००/-(एक हजार रुपये फकत) दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंड रक्कम जमा न केल्यास १०(दहा) दिवस साध्या कारागृहबंदीची शिक्षा ठोठावण्यात आली.

स्वा/-
(एस.ए.भैसारे)
पॅनल प्रमुख
तालुका विधी सेवा समिती
चामोर्शी

दि.१४/०३/२०२६.